भारतातील भाववाढीची स्थिती

प्रा.डॉ.आबसो शिंदे[१], प्राचार्य डॉ.विकास पवार[२]

[१]*अर्थशास्त्र विभाग, मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंड, पुणे-१६*

[२]*सी.के.गोयल महाविद्यालय, दापोडी, पुणे*

सारांश :

जगातील अनेक देशासमोर भाववाढीची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. भाववाढीच्या काळात पैशाचे मूल्य म्हणजेच क्रयशक्ती कमी होऊन वस्तू व सेवांच्या किमती वाढतात. साठेबाजी, भ्रष्टाचार, काळ्या पैशाच्या प्रमाणात वाढ इत्यादी सारख्या अपप्रवृत्तींना वाव मिळतो. सध्याच्या भाववाढीने जीवनावश्यक किंवा ग्राहकांच्या दैनंदिन वस्तूंच्या किंमती सतत वाढत असून, किंमती नियंत्रणात येण्याची चिन्हे दिसत नाहीत. भावावढीचा फायदा उद्योजक व व्यापाऱ्यांना होतो. कामगार व ठराविक उत्पन्न असणाऱ्या नोकरदार वर्गाच्या वास्तव उत्पन्नात घट होऊन त्यांचे राहणीमान घसरते. भारतातील भाववाढीबाबत सरासरी ग्राहक किंमती वरून इतर देशांच्या तुलनेत २०१५ मधील ग्राहक किंमत निर्देशांक (CPI-Consumer Price Index 5.88) हा जास्त आहे. त्यामुळे भाववाढीचा वेग नियंत्रित करणे भारतासमोरील एक महत्त्वाचे आव्हान आहे. भाववाढीची समस्या अन्नधान्य, खाद्यतेल, डाळी इत्यादीबरोबरच पेट्रोलजन्य पदार्थाची मागणी ज्या प्रमाणात वाढली त्या प्रमाणात पुरवठा न वाढल्याने निर्माण झाली. भारतासारख्या विकसनशील देशात भाववाढ नियंत्रित करण्यासाठी कडक राजकोषीय धोरणाबरोबरच मौद्रिक धोरणांचा एकत्रित वापर करणे गरजेचे आहे.

देशाच्या आर्थिक विकास प्रक्रियेसमोर अनेक आव्हाने उभी राहतात.

कळीचे शब्द : पैशाचे मूल्य, क्रयशक्ती, पैशाचे वास्तव मूल्य, दरडोई उत्पन्न, मूल्यवर्धित कर

प्रास्ताविक :

जगातील अनेक देशासमोर भाववाढीची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. १९३९-४५ ह्या काळात झालेल्या दुसऱ्या महायुद्धाचा खर्च भागविण्याकरिता मोठ्या प्रमाणात चलनवाढ झाली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने आर्थिक नियोजनाला सुरूवात केली व आर्थिक योजना पार पाडण्याकरिता मोठ्या प्रमाणावर चलनवाढीला चालना मिळाली. त्यामुळे वेगाने भाववाढ झालेली दिसून येते.

भाववाढीच्या काळात पैशाचे मूल्य म्हणजेच क्रयशक्ती कमी होऊन वस्तू व सेवांच्या किंमती वाढतात. साठेबाजी, भ्रष्टाचार, काळ्या पैशाच्या प्रमाणात वाढ इत्यादी सारख्या अपप्रवृत्तींना वाव मिळतो. भाववाढीच्या काळात पैशाचे वास्तव मूल्य कमी होते. अर्थव्यवस्थेत आर्थिक विषमता वाढते. लोकांची बचत करण्याची प्रवृत्ती कमी होऊन खर्च करण्याची प्रवृत्ती वाढते.

अर्थ व व्याख्या :

भाववाढीला इंग्रजीमध्ये Inflation असे म्हणतात. To Inflate म्हणजे फुगविणे. फुगा फुंकून त्याला फुगवितात तसे बाजारात पैसे वाटून वाटून इतके फुगतात की त्याची वाढ होते म्हणजेच भाववाढ होय.

अर्थशास्त्रज्ञ क्राऊथर यांच्या मते "ज्या अवस्थेत मुद्रेचे मूल्य घटत असते. म्हणजेच वस्तूच्या किंमती वाढत असतात ती अवस्था भाववाढीची होय. (A stage in which the value of money is falling i.e. prices are rising)

अर्थशास्त्रज्ञ हॉट्रे यांच्या मते, "वाजवीपेक्षा जास्तीच्या रोख पैशाचा पुरवठा म्हणजे भाववाढ होय."

अभ्यास पद्धती :

प्रस्तुत शोधनिबंध हा प्रामुख्याने द्वितीय साधन सामग्रीवर आधारित असून त्यासाठी विविध संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, मासिके, भारताची आर्थिक सर्वेक्षणे, रिझर्व्ह बँकेचे विविध अहवाल, हॅण्डबुक ऑफ स्टॅटिस्टिक ऑन इंडियन इकॉनॉमी आणि विविध संकेत स्थळे इत्यादींचा वापर केला आहे.

अभ्यासाची उद्दिष्ट्ये :

१) भारतातील भाववाढीची इतर देशाबरोबर तुलना करणे.
२) भारतातील भाववाढीच्या सद्यस्थितीचा आढावा घेणे.
३) भाववाढीच्या कारणांवरून उपाय योजनांची मांडणी करणे.

भाववाढीचा परिणाम :

भाववाढीचा फायदा उद्योजक व व्यापाऱ्यांना मोठ्या प्रमाणात होतो. कामगार व ठराविक उत्पन्न असणाऱ्या नोकरदार वर्गाचा वास्तव उत्पन्नात घट होऊन त्यांचे राहणीमान घसरते. बेकारी व दारिद्र्याची समस्या अधिक बिकट होते. भाववाढीचा आंतरराष्ट्रीय व्यापारावर वाईट परिणाम होऊन

देशाची निर्यात कमी होऊन व्यापारात तूट निर्माण होते. थोडक्यात भाववाढीमुळे देशाच्या आर्थिक विकास प्रक्रिये समोर अनेक आव्हाने उभी राहतात.

भाववाढीची वैशिष्ट्ये :

कोणत्याही देशातील भाववाढीची वैशिष्ट्ये सारखीच असतात. ही पुढीलप्रमाणे

१) भाववाढीच्या काळात सर्वसाधारणपणे सर्व वस्तूंची मागणी जास्त असते.

२) भाववाढीच्या काळात पैशाच्या साठ्यात, उत्पन्नात व दरडोई उत्पन्नात वाढ होते.

३) भाववाढीच्या काळात उत्पादन खर्चात वाढ होते.

४) पैशाच्या मूल्यात म्हणजेच खरेदी शक्तीत घट होते.

५) उत्पादन व रोजगारात वाढ होत नाही.

६) अर्थव्यवस्थेला पेलणाऱ्या वाढीपेक्षा भाववाढीचा वेग जास्त असतो.

७) परकीय चलनाच्या तुलनेत देशी चलनाचे मूल्य घटते.

भारतातील भाववाढीची इतर देशांबरोबर तुलना :

जगाच्या तुलनेत भारताचे क्षेत्रफळ २.४% (१३५८ कोटी चौरस किमी) असून लोकसंख्येचा विचार करता १७.६% (१२१.०२ कोटी) एवढी आहे. यामुळे वाढत्या लोकसंख्येच्या गरजा पूर्ण होण्याच्या दृष्टीने उपलब्ध साधन सामग्रीवर ताण येत असल्याने भारतीय अर्थव्यवस्थेत सतत भाववाढ दिसून येत आहे. इतर देशाच्या तुलनेत भारतातील भाववाढीचा दर (Inflation Rate) हा सरासरी ग्राहक किंमतीवरून (Average Consumer Price) काही प्रमाणात निश्चित होतो. त्यालाच ग्राहक किंमत निर्देशांक (CPI-Consumer Price Index) असे म्हटले जाते.

भारताची सरासरी ग्राहक किंमतीवरून इतर देशांशी तुलना

देश	२०००	२००५	२०१०	२०१४	२०१५
अमेरिका	३.३८	३.३९	१.६४	१.६२	०.१२
जपान	-०.६५	-०.२७	-०.७२	२.७६	०.८०
चीन	०.३५	१.७८	३.१७	२.००	१.४४
भारत	४.०२	४.२५	१२.११	५.९९	५.८८

(टीप : प्रत्येक देशातील त्या-त्या वर्षातील सरासरी विचारात घेतली आहे.)

भारताची सन २००० ते २०१५ च्या कालावधीमध्ये सरासरी ग्राहक किंमतीवरून तुलना केली असता असे दिसून येते की,

गेल्या पंधरा वर्षात चार देशातील सरासरी ग्राहक किंमतीमध्ये सतत बदल झालेला आहे. जपान या देशात भाववाढ कमी दिसून येते तर अमेरिकेत २००५ मध्ये ३.३९ पर्यंत सरासरी ग्राहक किंमत पातळी वाढली होती. त्यांनी त्यामध्ये २०१५ मध्ये १.४४ पर्यंत ग्राहक किंमत निर्देशांक कमी केला आहे. भारताची उच्चांकी सरासरी ग्राहक किंमत सन २०१० मध्ये १२.११ अशी होती. २०१५ मध्ये ५.८८ पर्यंत कमी झाली आहे. तरीदेखील इतर देशाच्या तुलनेत २०१५ मध्ये सर्वात जास्त दर भारतातच आहे. त्यामुळे भारतातील सर्वसामान्य नागरिकांना भाववाढीमुळे अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

भारतातील भाववाढीची कारणे :

कोणत्याही प्रमुख देशाच्या अर्थव्यवस्थेत जास्त पैसा मर्यादित वस्तूचा पाठलाग करतो. तेव्हा त्या देशात भाववाढ घडून येते. या भाववाढीची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे :

१) प्रचंड वाढती लोकसंख्या :

१९५१ मध्ये भारताची लोकसंख्या ३६.१ कोटीवरून २०११ मध्ये १२१.०२ कोटी एवढी प्रचंड प्रमाणात वाढली या वाढलेल्या लोकसंख्येमुळे अन्नधान्य तसेच इतर वस्तू व सेवांच्या मागणीत प्रचंड प्रमाणात वाढ झाली त्यामुळे पुरवठ्यात असंतुलन होऊन किंमती वाढतात.

२) अन्नधान्य उत्पादन दरातील चढ-उतार :

भारतीय शेती लहरी निसर्गावर अवलंबून आहे. त्यामुळे अन्नधान्य उत्पादनात मोठे चढ-उतार होतात. कमी-जास्त पर्जन्य, चक्रीवादळ, विविध पिकांवरील रोग इत्यादी नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान होऊन शेती उत्पन्नात घट होते. उद्योगांना कच्चा माल कमी प्रमाणात मिळतो. याचा एकत्रित परिणाम अन्नधान्य व इतर वस्तूंच्या किंमतीत वाढ होते.

३) पेट्रोलजन्य पदार्थांच्या किंमतीत वाढ :

पेट्रोलजन्य पदार्थांचे भारतातील उत्पादन अत्यल्प असल्यामुळे त्याची मोठ्या प्रमाणात आयात करावी लागते. पेट्रोलजन्य पदार्थाची निर्यात करणारे देश दरवर्षी किंमतीत वाढ करतात. त्यामुळे वाहतूक खर्चात वाढ होऊन सर्वच वस्तू व सेवांच्या किंमतीत वाढ होते.

४) करांच्या दरात वाढ :

भारत सरकारकडून उत्पादन कर, विक्री कर, आयात-निर्यात कर इत्यादी विविध प्रकारचे कर आकारले जातात. प्रत्येक वर्षी सरकार करांच्या दरामध्ये वाढ करते. त्यामुळे वस्तू व सेवांच्या किमतीत प्रचंड प्रमाणात वाढ होते. मूल्यवर्धित कर प्रणाली सुरू केल्यापासून ही समस्या अधिक

गंभीर बनली आहे.

५) तुटीचा अर्थभरणा :

चौथ्या योजनेपासून भारत सरकारने सतत तुटीचे अंदाजपत्रक सादर करून मोठ्या प्रमाणातच चलन छपाई केली. अर्थसंकल्पातील वाढती तुट व तुटीचा अर्थभरणा यामुळे अर्थव्यवस्थेत सतत पैशाचे प्रमाण वाढत गेले. त्यामुळे भाववाढीस चलन छपाई हा घटक देखील कारणीभूत आहे.

६) काळ्या पैशाचा प्रभाव :

काळा पैसा म्हणजे बेकायदेशीर कामातून मिळविलेला व कर चुकविण्यासाठी सरकारी नजरेतून लपवलेला पैसा होय. आयकर चुकविणारे तसेच बेकायदेशीर मार्गाने उत्पन्न मिळविणाऱ्या जवळ मोठ्या प्रमाणात काळा पैसा असतो. भ्रष्ट कारभारामुळे अशा काळ्या पैशाचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. अशा गैरमार्गाने मिळालेला पैसा खर्च करण्याच्या क्रियेतून चैनीच्या वस्तूंना, सुखद वस्तूंना येणारी मागणी वाढते. एकूणच मागणीत वाढ होऊन भाववाढ होते.

भारतातील भाववाढ नियंत्रणासाठी उपाययोजना :

कोणत्याही देशाला भाववाढ होणे ही एक गंभीर समस्या असते. भाववाढीची परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी शासनाने पुढीलप्रमाणे उपाययोजना करणे गरजेचे आहे.

१) भाववाढ नियंत्रित करण्यासाठी देशातील लोकसंख्या कमी असणे आवश्यक आहे. भारतात लोकसंख्या नियंत्रित ठेवण्यासाठी शासनाने कठोर कारवाई करून लोकसंख्या वृद्धी दर १ पर्यंत कमी करण्यावर भर दिला पाहिजे.

२) शेतकऱ्यांना आधुनिक पद्धतीने शेती करण्यासाठी कमी व्याजदाराने कर्ज पुरवठा करावा. अनुदानाच्या रूपाने आर्थिक सहाय्य पुरवावे तसेच शेती विकासाच्या दृष्टीने आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. त्यामुळे अन्नधान्य उत्पादनात वाढ होऊन अन्नधान्याच्या किंमती स्थिर ठेवण्यास मदत होईल.

३) उत्पादक व विक्रेत्यांकडून वस्तूंबाबत कृत्रिम टंचाई निर्माण होऊ नये यासाठी शासनाने कडक धोरण अवलंबावे. वस्तू साठ्याची माहिती शासनाला कळविणे बंधनकारक करावे. तसेच जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीचे बोर्ड दुकानाबाहेर लावणे विक्रेत्यांना बंधनकारक करावे.

४) देशातील सरकारच्या राजकोषीय धोरणाद्वारे अंदाजपत्रकातील वाढत चाललेली वित्तीय तूट कमी करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर १९९१ च्या जागतिकीकरणाच्या धोरणामुळे सरकारचा विविध क्षेत्रातील वाटा कमी होत आहे. त्यामध्ये वाढ घडवून आणल्यास किंवा सरकारचा सहभाग वाढल्यास भाववाढ नियंत्रणास मदत होईल.

५) भारतातील भ्रष्टाचार व काळा पैसा, कर चुकवेगिरी यावर नियंत्रण ठेवण्यासाठी कडक नियम करावेत. तसेच भारतातील रिझर्व्ह बँकेमार्फत मौद्रिक उपाययोजना करून सरकारने देशातील अतिरिक्त चलनपुरवठा कमी करून भाववाढीला नियंत्रित ठेवण्यासाठी प्रयत्न करावे.

६) भारताचे इंधनावरील परावलंबित्व कमी करण्यासाठी पर्यायी साधनांचा वापर करण्यावर शासनाने भर देण्याची गरज आहे. त्यामुळे इंधनासंबंधीची भाववाढ नियंत्रणात आणता येईल. परिणामी वस्तूंची किंमतवाढ आपोआप नियंत्रित राहील.

समारोप :

या शोधनिबंधामध्ये भारतातील भावाढीची स्थिती मांडली आहे. विशेषत: भारतातील भाववाढीची इतर देशाबरोबर तुलना करून भारतातील भाववाढीचे परिणाम, वैशिष्ट्ये, भारतातील भाववाढीची प्रमुख कारणे व भाववाढ नियंत्रणासाठी शासनाने कोणते उपाय करणे आवश्यक आहे हे दर्शविले आहे. भारतसारख्या विकसनशील देशात भाववाढ नियंत्रित करण्यासाठी कडक राजकोषीय धोरणाबरोबरच मौद्रिक धोरणांचा एकत्रित वापर करणे गरजेचे आहे तरच भाववाढ नियंत्रणात आणणे शक्य आहे.

संदर्भसूची :

1) *Indian Economy, V.K.Puri and S.K.Misra, Himalaya Publishing House, Fourth Edition - 2016*

2) *Indian Economy, Datta & Sundaram, S.Chand Publication, New Delhi, 2015*

३) भारतीय अर्थव्यवस्था डॉ.देसाई आणि डॉ.नि.भालेराव, निराली प्रकाशन, सप्टेंबर २००६

४) भारताचे आर्थिक धोरण, डॉ.गौतम भोग आणि डॉ.निलेश दांगड, सक्सेस प्रकाशन, जून २०१३

५) संशोधन पद्धती शास्त्र व तंत्र, डॉ.प्रदीप आगलावे, विद्या प्रकाशन, नागपूर २०००

6) *Economic Survey, Government of India 2014-15*

7) *Reserve Bank of India Bulletin 2014-157) Reserve Bank of India Bulletin 2014-15*

८) वाणिज्यविद्या जर्नल, वाणिज्य शास्त्र विभाग व संशोधन केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे, ऑक्टोबर-डिसेंबर २०१३

९) दै.सकाळ वृत्तपत्र, १७ ऑक्टोबर २०१६

10) *www.inflation in india*

11) *www.rbi.org*